दि. 12.09.2026

प्रेसनोट

## लातूरात चार ठिकाणी मटका व जुगार अड्डयांवर पोलीस उप महानिरीक्षक यांच्या पथकाच्या धाडी

## 28 आरोपींविरुद्ध कारवाई, 21 लाखांचा मुद्देमाल जप्त

नांदेड परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी आपल्याकडील अधिकारी व अंमलदारांचे एक पोलीस पथक लातूर जिल्हयात रवाना केले होते.

सदर पथकाने, दिनांक 11.09.2029 रोजी विवेकानंद चौक पोलीस ठाणे हद्दीतील माताजी नगर येथे पत्र्याचे शेडमध्ये गोविंद पाटील हे चालवत असलेल्या मटका बुकीवर कारवाई करत, 7,420/-रुपयांची रोकड व 42,400/-रुपयांचे (5) मोबाईल जप्त केले असून, नमूद प्रकरणात एकूण (6) आरोपीतांना ताब्यात घेवून, त्यांचेविरुध्द विवेकानंद चौक पोलीस ठाणे येथे गुरनं 642/2026 कलम 12 (अ) महाराष्ट्र जुगार कायदयान्वये गुन्हा नोंदविला आहे.

त्याचप्रमाणे, कातपूर रोडवरील एका गाळ्यात प्रदीप पाटील व संतोष धनवे हे चालवत असलेल्या बेकायदेशीर ऑनलाइन लॉटरी सेंटरवर छापा मारून, रोख 3,690/- व साहित्य असा एकूण 24,190/- रुपयांचा मुद्देमाल जप्त करून, (4) आरोपींविरुद्ध पोलीस ठाणे विवेकानंद चौक येथे गु.र.न. 643/ 2026 कलम 4,5 महाराष्ट्र जुगार कायद्याप्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

तद्नंतर, एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे हद्दीत, बार्शी रोडवरील प्रमोद पेट्रोलपंपासमोरील पत्र्याचे शेडमध्ये, अमितसिंग शरदसिंग बिसेन हे चालवत असलेल्या मटका बुकीवर कारवाई करत, 11,860/-रुपयांची रोकड, 50,000/-हजार रुपयांचे (5) मोबाईल व 71,500/- रुपयांचे संगणक साहित्य जप्त केले असून, नमूद प्रकरणात एकूण (6) आरोपीतांना ताब्यात घेवून, त्यांचेविरुध्द एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे येथे गुरनं 627/2026 कलम 12 (अ), 4(1)(a), 4(1)(g) महाराष्ट्र जुगार कायदयान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

लातूर शहरातील उपरोक्त कारवायांसोबतच, पथकाने अहमदपुर पोलीस ठाण्याच्या हद्दीत, काळेगांव रोड येथील बांधकाम चालू असलेल्या घरामध्ये जुगार खेळणाऱ्यांविरुद्ध कारवाई करत, 2,46,300/-रुपयांची रोकड, (14) मोबाईल, (2) चारचाकी वाहने, (7) मोटार सायकली असा एकूण 18,81,300/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, नमूद प्रकरणात एकूण (12) इसमांविरुध्द कारवाई करुन, त्यांचेविरुध्द अहमदपुर पोलीस ठाणे येथे गुरनं 601/2026 कलम 4,5 महाराष्ट्र जुगार कायद्याअन्वये गुन्हा नोंदवला आहे.

उपरोक्त प्रमाणे चार कारवायांत, पथकाने एकूण (28) आरोपींकडून 2,69,190/- रुपयांची रोकड, (24) मोबाईल, (2) चारचाकी वाहने, (7) मोटार सायकली व संगणक साहित्य असा एकूण 20,88,590/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

सदर कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांचेसह पोहेकॉ/ प्रदिप खानसोळे, पोहेकॉ/ गणेश राठोड व पोहेकॉ/ गजानन डवरे यांनी सहभाग घेतला. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबाबत पोलीस उप महानिरीक्षक श्री शहाजी उमाप यांनी पथकातील अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

' खबर ' हेल्पलाइन वरुन माहिती द्या : अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलीसांना पोहोचविता यावी, या दृष्टिकोनातून, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने 91 50 100 100 हा मोबाईल क्रमांक असलेली 'खबर' नावाची हेल्पलाइन सुरू केली असून, सदर हेल्पलाइन वरून नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयापर्यंत पोहचवावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक श्री. शहाजी उमाप यांनी केले आहे.

पोलीस उप महानिरीक्षक कार्यालय,
नांदेड परिक्षेत्र, नांदेड